महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३७

# महाराजा सयाजीराव आणि भारताचा स्वातंत्र्यलढा

राहुल वणवे



महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३७

# महाराजा सयाजीराव आणि भारताचा स्वातंत्र्यलढा

राहुल वणवे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
भारताचा स्वातंत्र्यलढा
इतिहास
राहुल वणवे
●
प्रकाशन क्रमांक - ५७
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : राहुल वणवे,
चांदोली वसाहत, काखे.
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
पिन - ४१६ ११४
मो. ९१७२०२४४४५
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५१ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# भारताचा स्वातंत्र्यलढा

आधुनिक भारताच्या जडणघडणीतील ‘सयाजीपर्व’ इतर सर्वच क्षेत्रांप्रमाणे स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाच्या अंगानेही पूर्णतः दुर्लक्षित राहिलेले आहे. अगदी १८८५ च्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून ते १९३९ मध्ये सयाजीरावांच्या मृत्यूपर्यंत देशातील मवाळ-जहाल अशा दोन्हीही विचारधारांच्या स्वातंत्र्य प्रयत्नांना सयाजीरावांनी इंग्रजांच्या विरोधाला अजिबात न जुमानता सहकार्य केले. भारताबाहेर जगभरातील ब्रिटिश विरोधी आघाडीशी सयाजीरावांचा घनिष्ठ संपर्क होता. अगदी हिटलर-मुसोलिनीशी असणारा सयाजीरावांचा संवाद हा स्वातंत्र्यासाठीच्या आंतरराष्ट्रीय दबावाचा भाग होता. म्हणूनच आधुनिक भारताचा इतिहास लिहीत असताना तो सयाजीविरहित करणे म्हणजे ‘जेवण मीठविरहित करण्या’सारखे आहे. भारताचा स्वातंत्र्यलढा आणि सयाजीराव हा विषय २०१६ पर्यंत पूर्णतः दुर्लक्षित होता. परंतु बाबा भांड यांनी २०१६ मध्ये ‘स्वातंत्र्यलढ्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड’ ग्रंथ लिहून हा विषय पहिल्यांदा चर्चेत आणला.

भारतातील ५६५ संस्थानिकांमध्ये सयाजीराव हे एकटे सार्वभौम राजे होते. इंग्रजांशी असलेल्या मैत्रीच्या करारामुळे त्यांचा दर्जा स्वतंत्र राजाचा होता. स्वातंत्र्यासाठीच्या सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नाचे केंद्र बडोदा होते. या चळवळीचे सूत्रधार अरविंद घोष हे महाराजांचे खासगी सचिव होते. बाळ गंगाधर टिळक यांना महाराजांनी पुण्यातील आपला गायकवाड वाडा इंग्रजांच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी कागदोपत्री व्यवहार दाखवून भेट दिला. दादाभाई नौरोजी हे तर बडोद्याचे दिवाण होते. लंडनमधील इंडिया हाउस बांधण्यासाठी श्यामजी कृष्ण वर्मा यांना महाराजांनी आर्थिक मदत केली होती. गोपाळ कृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी, मादाम कामा, तारकनाथ दास, बिपीनचंद्र पाल, दिनशा वाच्छा, बॅ. विनायक सावरकर, बाबाराव सावरकर इ. लोकांना सयाजीरावांनी आर्थिक सहाय्य केले होते. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू हे क्रांतिकारक बडोद्यात आश्रयाला आल्याचे पुरावे सापडतात. तर जवाहरलाल नेहरू लंडनमध्ये शिकत असताना रात्री १ वाजता गुप्तपणे सयाजीरावांना भेटल्याचे संदर्भ नेहरू समग्र वाङ्मयात सापडतात. यावरून दादाभाई नौरोजी ते पंडित नेहरू या स्वातंत्र्यलढ्याच्या प्रदीर्घ पटावरील सयाजीरावांचा प्रभाव अधोरेखित होतो.

## सार्वभौम राजे : सयाजीराव

१८०२ मध्ये बडोद्याच्या गायकवाडांनी ईस्ट इंडिया कंपनीशी मैत्रीचा करार केला. या तहामुळे बडोदा सरकार इंग्रजांचे मांडलिक न होता मित्र झाले. हाच तहनामा ब्रिटिश सरकारने पुढे स्वीकारला. २७ मे १८७५ ला राज्यारोहण झालेल्या सयाजीरावांच्या औपचारिक शिक्षणादरम्यान त्यांचे शिक्षक एफ. ए. एच. इलियट यांनी सयाजीरावांना ईस्ट इंडिया कंपनी आणि बडोदा सरकारमधील १८०२ चा मैत्रीचा करार समजावून सांगितला. पुढे १८८१ ला प्रत्यक्ष राज्यकारभाराची सूत्रे हाती आल्यानंतर सयाजीरावांनी इंग्रजांशी असलेला मैत्रीचा करार पुन्हा तपासून बघितला. तेव्हापासून आपण इंग्रजांचे मांडलिक नसून मित्र आहोत ही सार्वभौमत्वाची भावना सयाजीरावांमध्ये रुजली.

तत्कालीन भारतापैकी ७५% भारत हा ब्रिटिश सरकारच्या ताब्यात होता. तर केवळ २५% भारतावर संस्थानिकांची हुकूमत होती. ब्रिटिश हुकमत असलेल्या भागांवर ब्रिटिश पार्लमेंटने केलेले कायदे लागू होते. मात्र हे कायदे उर्वरित संस्थानांना लागू होत नसत. असे कलम ब्रिटिश व संस्थानिकांच्या मूळ करारात सामील होते. या बाबीचा अभ्यास सयाजीरावांनी केला होता. त्याचबरोबर पुण्यातील न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले आणि रामकृष्ण भांडारकरांसारख्या सामाजिक सुधारणांच्या नावाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध कार्य करणाऱ्या

लोकांमध्ये सयाजीरावांचा वावर वाढला होता. हळूहळू स्वातंत्र्यासाठीच्या सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांचे केंद्र बडोदा बनत चालले होते.

## सयाजीराव आणि राष्ट्रीय काँग्रेस

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात ब्रिटिश सत्तेविरुद्धचा असंतोष वाढत चालला होता. जानेवारी १८८५ ला 'मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली. फिरोजशहा मेहता, बहरुद्दीन तैयबजी, दिनशा वाच्छा हे संस्थापक सदस्य होते. पुढे डिसेंबर १८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. या दोन्ही संस्थांच्या सदस्यांशी व पदाधिकाऱ्यांशी सयाजीरावांचे जवळचे संबंध होते. मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या तीन सदस्यांना इंग्लंडला जाण्यासाठी महाराजांनी अडीच हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य केले होते. सयाजीराव काँग्रेसच्या अनेक अधिवेशनास हजर राहिले होते. सयाजीरावांबरोबरच रावबहादूर माधवलाल नंदलाल, हरिलाल हर्षदराय, अब्बास तैयबजी, सुमंत मेहता, मोहनलाल पंड्या आणि दिवाण अंबालाल साकरलाल हे बडोदा संस्थानचे अधिकारीही काँग्रेसच्या अधिवेशनात उत्साहाने भाग घेत.

१८९२ मध्ये अ. भा. राष्ट्रीय काँग्रेस समितीचे कार्यकर्ते दादाभाई नौरोजी हे लिबरल पार्टीचे उमेदवार म्हणून इंग्लंडच्या फिन्सवारी भागातून 'हाउस ऑफ कॉमन्स'च्या निवडणुकीसाठी कॅप्टन एफ. टी. यांच्याविरुद्ध उभे होते. सयाजीराव महाराजांनी

दादाभाई नौरोजींना निवडणूक खर्चासाठी १५,००० रुपयांची मदत केली. या निवडणुकीत दादाभाई नौरोजी विजयी झाले; परंतु पक्षाने पक्षनिधी म्हणून पुन्हा १५,००० रु.ची मागणी केली. दादाभाई इतकी मोठी रक्कम देऊ शकत नसल्याने पक्ष सदस्यत्व सोडण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सयाजीरावांना ही बाब कळताच त्यांनी पुन्हा दादाभाईंना १५,००० रु. दिले. सयाजीराव गादीवर येण्यापूर्वी मल्हारराव गायकवाडांच्या कारकिर्दीत दादाभाई नौरोजी हे बडोद्याचे दिवाण होते, तर दादाभाईंचे नातू जाल नौरोजी यांना सयाजीरावांनी बडोदा संस्थानात नोकरी दिली.

१८९५ ला पुण्यात झालेल्या काँग्रेस अधिवेशनाला महाराजांनी २,००० रु.ची मदत केली. १८९७ मध्ये लंडनच्या वेल्वी कमिशनसमोर भारताची बाजू मांडण्यासाठी तीन सदस्यांचे प्रतिनिधी मंडळ पाठवण्याचे ठरले. या सदस्यांमध्ये गोपाळ कृष्ण गोखलेंचादेखील समावेश होता. इंग्लंडला जाण्यापूर्वी गोखलेंनी सयाजीराव महाराजांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी महाराजांनी गोखलेंना प्रवासखर्चासाठी २,५०० रु. दिले. १९०२ व १९०६ चे काँग्रेस अधिवेशन अनुक्रमे अहमदाबाद व कलकत्ता येथे झाले. या दोन्ही अधिवेशनावेळी काँग्रेसने भरवलेल्या उद्योग व सामाजिक परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते.

## बापट प्रकरण

महाराजांनी सेटलमेंट कमिशनर म्हणून आपले गुरू मि. इलियट यांची नियुक्ती केली. या जबाबदारीच्या कामात मदत करण्यासाठी वासुदेव बापट नावाच्या विश्वासू अधिकाऱ्याची नेमणूक केली. इलियट जहागीरदार, मानकरी आणि देवस्थानच्या जमिनीची कागदपत्रे तपासू लागले. या तपासणीदरम्यान अनेकांनी राज्याचा महसूल बुडवून जमिनी बळकावल्याचे समोर आले. इलियट व बापट या लबाड लोकांविरुद्ध योग्य ते कायदेशीर निर्णय घेऊ लागले. ज्यांनी जमिनी बळकावलेल्या आहेत त्या लोकांनी बडोदा सरकारविरुद्ध रेसिडेंटकडे अर्ज केले. वासुदेव बापट काम करताना लाच घेतात व लाच न देणाऱ्याविरुद्ध निकाल देतात अशा तक्रारी केल्या जाऊ लागल्या. इलियट यांचा बापटांवर विश्वास होता; पण तत्कालीन दिवाण मणिभाई जसभाई हे इलियट व बापटांच्या कामावर नाराज होते.

दिवाण आणि रेसिडेंट बिडुल्फ यांनी एकत्र येऊन बापटांविरुद्ध कारस्थाने सुरू केली. बिडुल्फ यांच्याकडे आलेल्या बापटांविरुद्धच्या अर्जांची चौकशी करण्याचे आदेश दिवाणांना दिले. दिवाणांनी रेसिडेंटच्या आग्रहात्सव बापटांविरुद्ध चौकशी कमिशन नेमले. प्रत्यक्षात मात्र रेसिडेंट यांना बडोद्याच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्याचा काहीच अधिकार नव्हता; परंतु यादरम्यान सयाजीराव परदेशी असल्याने रेसिडेंटनी

दिवाणाला हाताशी धरून बडोद्याच्या राज्यकारभारात हस्तक्षेप केला. आपल्याबद्दल दिवाणांची नाराजी वाढत असल्याने इलियट रजा घेऊन युरोपला गेले.

इलियट यांच्या जागी सेटलमेंट कमिशनर म्हणून मेकॉनकी नावाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या मेकॉनकींवर बापटांविरुद्धची चौकशी करण्याची जबाबदारी देऊन त्यांना स्पेशल मॅजिस्ट्रेटचे अधिकार देण्यात आले. बापट कमिशनचे काम सुरू झाले. सरकारतर्फे असणाऱ्या फिरोजशहा मेहता या नामांकित वकिलांना कागदपत्रे बघितल्यानंतर बापटांविरुद्ध दिवाण आणि रेसिडेंट यांनी कट केल्याचे लक्षात आले. मेहतांनी हा खटला चालवण्यास नकार दिला. त्यामुळे सरकारने दुसरे वकील नेमले.

बापटांची बाजू मांडण्यासाठी पुण्याहून बाळ गंगाधर टिळक बडोद्यात आले. त्यांनी कमिशनचे साक्षी-पुरावे तपासले. बापटांविरुद्ध कोणताही ठोस पुरावा समोर आला नाही; परंतु रेसिडेंट आणि दिवाणांच्या दबावामुळे कमिशनने १६ मे १८९६ ला यासंबंधी निर्णय दिला. या निर्णयात कमिशन म्हणाले बापटांनी लाच घेतल्याचा सबळ पुरावा सापडला नाही; परंतु बडोदा संस्थानात नोकरी करत असताना जो ठरलेला पगार आहे त्याव्यतिरिक्त इतर बेकायदेशीर रक्कम घेतल्याचा त्यांच्यावरील गुन्हा सिद्ध झाला असल्याने त्यांना सहा महिन्याची कैद आणि बाबाशाही दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा केली जावी. अशा

प्रकारचा अहवाल देऊन अंतिम निर्णयासाठी महाराजांकडे पाठविला. यावेळी महाराज बडोद्यात नसल्याने कलेक्टर खासेराव जाधवांनी या प्रकरणाची माहिती महाराजांना पत्राद्वारे कळवून तात्काळ परत येण्यास सांगितले. पत्र मिळताच सयाजीराव बडोद्यास परतले. महाराजांनी बापट प्रकरणासंदर्भात खासेराव जाधव आणि अरविंद घोष यांच्याकडून माहिती मिळविली.

महाराजांनी या केसबद्दल हायकोर्टाचे न्यायमूर्ती अंबालाल साराभाई देसाई, रा. विनायकराव पंडित, मुलकी खात्याचे प्रमुख रा. जयसिंगराव आंग्रे या तज्ज्ञांना अहवाल देण्याच्या सूचना केल्या. यांनी दिलेल्या अहवालानुसार दोन विरुद्ध एक अशी परिस्थिती निर्माण झाल्याने पुन्हा हे प्रकरण हायकोर्टाचे न्यायमूर्ती जमशेटजी खंडाळावाला यांच्याकडे दिले. खंडाळावाला यांनी बापटांनी लाच घेतली नसल्याचे आपल्या अहवालातून सांगितले. सयाजीरावांनी ९ ऑक्टोबर १८९५ रोजी अंतिम निर्णय दिला, “रा. वासुदेव सदाशिव बापट यांना त्यांजवरील सर्व आरोपांसंबंधाने निर्दोषी ठरविण्यात येत आहे. तथापि या प्रकरणासंबंधाच्या सर्व हकीकतीचा विचार करिता, रा. बापट यांना या इतउप्पर या राज्याचे नोकरीत ठेवणे इष्ट नाही. म्हणून त्यांना नोकरीतून मुक्त करण्यात येत आहे.” बापट निर्दोष आहेत हे सिद्ध झाले असले तरी त्यांना नोकरीतून काढून टाकावे

लागल्याचे दु:ख महाराजांना झाले. या प्रकरणामध्ये दिवाण मणिभाईंनी जबाबदारी नीट सांभाळली नसल्याने थोड्याच दिवसांत दिवाणांना बदलण्याचा निर्णय महाराजांनी घेतला.

सयाजीरावांनी बापटांना सेवेतून मुक्त करताना महिन्याला दीडशे रुपये पेन्शन देण्याचा निर्णय घेतला. ही बातमी रेसिडेंटना समजल्यावर अस्वस्थ होऊन त्यांनी पुन्हा थयथयाट केला. शेवटी महाराजांनी रेसिडेंटना भेटून स्पष्टपणे सांगितले, “संस्थानच्या अंतर्गत व्यवस्थेत हात घालण्याचा रेसिडेंटना बिलकूल अधिकार नाही.” यावर रेसिडेंटने आग्रह धरला, “संस्थानातील बऱ्यावाईट गोष्टींची माहिती आम्हाला कळवली पाहिजे. हिंदुस्थानात शांतता व सुव्यवस्था नांदावी याबद्दल ब्रिटिश सरकार जबाबदार आहे, त्याअर्थी त्यांना सर्व हकीकती कळविल्याच पाहिजेत.” यावर सयाजीराव म्हणाले, “संस्थानात शांतता आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवणे एवढेच सरकारचे प्रतिनिधी म्हणून तुमचे काम आहे. आमच्या अंतस्थ कारभारात लक्ष घालण्याचे काय कारण आहे?” महाराजांचे हे बोलणे ऐकून रेसिडेंट उच्चारले,“आपले हे बोलणे म्हणजे हिंदुस्थान सरकारच्या अधिराज्याचे जू झुगारून देण्याचा प्रयत्न आपण करत आहात, असा अर्थ आम्ही काढावा का?” ब्रिटिश सरकारच्या हस्तक्षेपास कंटाळलेले सयाजीराव शेवटी म्हणाले, “तुम्ही आम्हाला नोकर समजता काय? काय

चांगले आहे नाही हे आम्हाला कळते.” सयाजीराव आणि रेसिडेंट यांच्यातील हा शाब्दिक वाद सयाजीरावांचा ब्रिटिश सत्तेविरुद्धचा राग व्यक्त करणारा आणि आम्ही तुमचे मांडलिक नसून सार्वभौम राजे आहोत हे सूचित करणारा आहे.

न्यायमूर्ती गोविंद महादेव रानडे आणि बाळ गंगाधर टिळक या राष्ट्रीय नेत्यांशी महाराजांचे जवळचे संबंध होते. सयाजीराव आणि टिळकांची भेट १८९० मध्ये झाली. बापट प्रकरणानंतर १८९४-९५ ला ती अधिक वृद्धिंगत झाली. या प्रकरणात बाळ गंगाधर टिळकांनी बापटांची बाजू सांभाळून महाराजांना एक प्रकारे मदतच केली आहे. सयाजीरावांनी पुण्यातील आपला गायकवाड वाडा टिळकांच्या केसरी, मराठा वृत्तपत्रास भेट देण्याचे ठरवले; परंतु या गोष्टीला रेसिडेंट यांनी विरोध केला. शेवटी इंग्रजांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी कागदोपत्री व्यवहार दाखवून सयाजीरावांनी हा वाडा टिळकांना भेट दिला. आज हाच वाडा टिळकांचा केसरी वाडा म्हणून ओळखला जातो.

## खासेराव जाधव

सयाजीरावांनी १८८४ मध्ये आपले नातेवाईक खासेराव जाधव यांना कृषिक्षेत्रातील उच्चशिक्षणासाठी लंडनला पाठवले. त्यावेळी खासेरावांची लंडनमधील इंडिया हाउसच्या श्यामजी कृष्ण वर्मांशी ओळख झाली. ‘इंडिया हाउस’ हे ब्रिटिश सरकारविरुद्ध चळवळीचे आणि देशप्रेमी भारतीयांचा गट समन्वित करण्याचे ठिकाण होते. याबरोबरच ‘इंडियन मजलिस’

नावाची आणखी एक हिंदुस्थानी विद्यार्थ्यांची संघटना येथे कार्यरत होती. बंगालचे अरविंद घोष या संघटनेचे सेक्रेटरी होते. मुंबईहून गेलेले केशवराव देशपांडेही येथे येत. लंडनमधील या क्रांतिकारी विचारांच्या गटात खासेराव जाधव सामील झाले. खासेराव १८९० ला शिक्षण पूर्ण करून भारतात परतले.

लंडनमध्ये असताना केशवराव देशपांडे, गोविंदराव माडगावकर आणि अरविंद घोष यांच्यात त्यावेळी झालेली मैत्री आयुष्यभर टिकली. अरविंद घोष आणि केशवराव देशपांडे यांनाही बडोद्यात आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका खासेरावांची होती. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने प्रयत्न करणाऱ्या सर्व क्रांतिकारकांना सयाजीराव खासेरावांमार्फत सहकार्य करत असत.

खासेराव जाधव, त्यांचे लहान बंधू मेजर माधवराव, प्रो. माणिकराव यांनी अरविंद घोष बडोद्यात येण्यापूर्वी समविचारी मित्रांचा गट असणारी 'तरुणसंघ' नावाची संघटना स्थापन केली होती. संघटनेच्या सभासदांत बडोदा सरकारच्या नोकरीतील अनेक अधिकारी नोकर होते. खासेराव जाधवांच्या घरी या संघटनेच्या बैठका होत असत. पुढे अरविंद घोष व केशवराव देशपांडे बडोद्यात आल्यानंतर या संघटनेच्या कामास अधिक वेग आला. अरविंद घोष खासेरावांच्या घरीच राहू लागले. खासेराव जाधवांचे निवासस्थान हे क्रांतिकारकांचा अड्डा बनला. या ठिकाणी बाळ गंगाधर टिळक, सयाजीराव, अरविंद घोष यांच्या

भेटीगाठीतून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा आराखडा तयार होत गेला. खासेरावांवर टिळकांच्या विचारांचाही प्रभाव होता. खासेरावांच्या पुढाकाराने बडोद्यात गणेशोत्सव, शिवजयंती हे राष्ट्रप्रेमाच्या निमित्त होणारे कार्यक्रम सुरू झाले.

## अरविंद घोष

१८९२ ला अरविंद घोष या तरुण क्रांतिकारकांची लंडन येथे महाराजांशी भेट झाली. अरविंद घोष आय.सी.एस. ची लेखी परीक्षा पास झाले होते. परंतु घोडेस्वारीची चाचणी न देता त्यांनी ब्रिटिश प्रशासनात नोकरी नाकारली. सयाजीरावांनी अरविंद घोषांना बडोद्यास येण्याचे निमंत्रण दिले. महाराजांच्या या निमंत्रणावरून अरविंद घोष १८९३ ला बडोद्यास आले. बडोद्यात त्यांच्या राहण्याची व्यवस्था खासेरावांच्या बंगल्यात करण्यात आली. पुढे बडोदा सोडेपर्यंत दहा-बारा वर्षे ते तेथेच राहिले.

इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत असणारे 'इंदुप्रकाश' हे साप्ताहिक मुंबईहून प्रकाशित होत असे. या साप्ताहिकाचे मालक सावळाराम यंदे यांना अगदी सुरुवातीपासूनच सयाजीरावांचे भक्कम पाठबळ होते. इंदुप्रकाशच्या इंग्रजी आवृत्तीचे संपादक बॅ. केशवराव देशपांडे आणि अरविंद घोष लंडनला असल्यापासून मित्र होते. केशवरावांनी अरविंदांना राजकारण आणि संस्कृतीवर इंदुप्रकाशमध्ये लेखमाला लिहायला सांगितली. 'न्यू लॅम्पस फॉर ओल्ड' असे लेखमालेचे तर 'झिरो' असे लेखकाचे नाव ठरविण्यात आले. या लेखांमधून अरविंद घोष पारतंत्र्यात

अडकलेल्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कराव्या लागणाऱ्या क्रांतिकार्याची जनसामान्यांना जणू ओळखच करून देत होते. तसेच काँग्रेसमधील नेत्यांच्या बोटचेपे धोरणावरही अत्यंत मुद्देसूद आणि कठोर शब्दात टीका करण्याचे काम इंदुप्रकाशमधील लेखातून होऊ लागले. अशा जहाल लेखांच्या लेखकाला जाणून घेण्याची उत्सुकता बाळ गंगाधर टिळकांना वाटू लागली.

इंदुप्रकाशमधील हे लेख अरविंद लिहीत आहेत हे सयाजीरावांना माहीत होते. सावळाराम यंदे आणि सयाजीराव यांच्यातील संबंधाशी ब्रिटिश सरकार परिचित होते. त्या जहाल लेखमालेच्या लेखकासंदर्भात सयाजीरावांकडे विचारणा केली असता त्यांनी यावर भाष्य करण्याचे टाळले. अरविंदांची 'न्यू लॅम्प्स फॉर ओल्ड' ही लेखमाला सहा महिने चालली. या लेखमालेनंतर अरविंद घोषांनी प्रसिद्ध बंगाली लेखक बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या वंदे मातरमवर दुसरी लेखमाला सुरू केली.

बंगालमधील राष्ट्रीय चळवळीस गती देण्यासाठी अरविंद घोषांनी खासेरावांच्या मदतीने एक योजना आखली. या योजनेनुसार १८९८-९९ ला जितेंद्रनाथ बंडोपाध्याय या बंगाली तरुणास खोट्या नावाने बडोदा सेनेत प्रशिक्षणार्थी सैनिक म्हणून भरती केले. बडोदा सेनेत भरती झालेल्या या तरुणास शस्त्र चालविणे, स्फोटकांचा नेमकेपणाने उपयोग करण्याचे प्रशिक्षण दिले गेले. १९०२ मध्ये प्रशिक्षण पूर्ण होताच अरविंद घोषांनी

बंगालमधील क्रांतिकारी संघटनेचे कार्य या तरुणावर सोपवून बंगालला पाठविले. पुढे १९०८ पर्यंत त्या तरुणाने वंग विद्रोहाचे काम केले.

अरविंद घोषांचे लहान बंधू वारिन्द्र यांना बडोद्यात बोलावून आयुष्यभर स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यासाठी झटण्याची शपथ दिली. वारिन्द्रांनी गंगनाथ राष्ट्रीय विद्यालयात काही काळ प्रशिक्षण घेतले आणि ते बंगालला परतले. बडोद्यातील क्रांतिकारी अंबुभाई आणि छोडभाई हे पुराणी बंधू वारिन्द्रचे मित्र होते. हे पुराणी बंधू अरविंदांचे बंधू वारिन्द्र यांच्याकडून बॉम्ब बनविण्यास शिकले होते.

## केशवराव देशपांडे

अरविंद व खासेरावांचे मित्र केशवराव देशपांडे लंडनमध्ये बॅरिस्टर होऊन १८९३ मध्येच परतले. केशवरावांना न्यायाधीश होण्याची संधी होती; परंतु त्यांनी ती नाकारली आणि तत्कालीन 'इंदुप्रकाश' साप्ताहिकाचे संपादकत्व स्वीकारले. केशवरावांनी अरविंद घोष यांच्याकडून इंदुप्रकाशसाठी "न्यू लॅम्प्स फॉर ओल्ड" या नावाची लेखमाला लिहून घेतली. सयाजीरावांनी खासेराव व अरविंद यांच्या माध्यमातून केशवराव देशपांडेंना बडोद्यात बोलावले व त्यांची कलेक्टरपदी नियुक्ती केली.

नवसारीचे कलेक्टर बॅ. केशवराव देशपांडे यांनी नवसारी येथे स्वदेशी वस्तूंचे मोठे प्रदर्शन भरवले. या प्रदर्शनाचे उद्घाटन सयाजीरावांनी केले होते. देशपांडे प्रदर्शनाच्या निमित्ताने

देशभरातील क्रांतिकारकांना आश्रय देत असल्याची शंका ब्रिटिश सरकारला आली. या संदर्भातील माहिती मिळवण्याचा प्रयत्न ब्रिटिश गुप्तहेरांनी केला; परंतु त्यांना यश आले नाही. वास्तविक ब्रिटिश सरकारचा संशय खरा होता. या प्रदर्शनाच्या निमित्ताने काही बंगाली क्रांतिकारक नवसारीत आले होते. स्वदेशी वस्तूंच्या प्रदर्शनाच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीच्या कार्याचा प्रसार करण्याची सयाजीरावांची युक्ती हा राजद्रोह आहे हे सिद्ध करणे ब्रिटिश सरकारला अखेरपर्यंत शक्य झाले नाही.

केशवराव देशपांडे आणि खासेराव जाधव या दोघांचा राजद्रोही चळवळीच्या लोकांना पाठिंबा असल्याने, सयाजीरावांनी त्यांच्याविरुद्ध चौकशी करावी यासाठी गव्हर्नर आणि व्हॉइसराय यांच्याकडून दबाव वाढला. केशवराव चांदोद येथील गंगनाथ भारतीय राष्ट्रीय विद्यालय, अरविंद घोषांची 'भवानी मंदिर' आणि प्रो. माणिकरावांचा आखाडा या राजद्रोही चळवळींच्या कार्यात सहभागी होते. या सगळ्या बाबींकडे रेसिडेंट कॉब आणि ब्रिटिश सी. आय. डी. लक्ष ठेवून होते. या दरम्यान काही पुरावे समोर आल्याने रेसिडेंट कॉब यांनी केशवरावांना सेवेतून काढून टाकण्याची मागणी केली.

सयाजीरावांनी केशवराव देशपांडे यांच्याविरुद्ध असलेल्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश देत, विनाचौकशी

त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करणार नसल्याचे स्पष्टपणे सांगितले. देशपांडे प्रकरणासंदर्भात महाराजांनी तेरा सदस्यांची चौकशी समिती नेमून समितीपुढे आपली बाजू मांडण्याचा केशवरावांना आदेश दिला. केशवरावांच्या बाजूने बहुमत आल्याने या समितीने देशपांडे यांना निर्दोष ठरविले. चौकशी समितीच्या निर्णयानुसार सयाजीरावांनी केशवराव देशपांडे यांना निर्दोष जाहीर केले. सयाजीरावांची ही कृती आपल्या क्रांतिकारक अधिकाऱ्यांना दिलेल्या भक्कम पाठिंब्याचा पुरावाच आहे.

महाराजांच्या या निर्णयामुळे ब्रिटिश सरकारचा रोष आणखी वाढला. आपल्यामुळे ब्रिटिश सत्ता महाराजांवर नाराज असून यामुळे त्यांच्यावर संकटे वाढू नयेत म्हणून केशवराव देशपांडे यांनी स्वतःच नोकरीचा राजीनामा दिला. केशवरावांच्या राजीनाम्याने सयाजीरावांना फार दु:ख झाले. महाराजांनी त्यावेळी आदेश दिला की, “केशवरावांनी एकनिष्ठ राहून राज्याची प्रामाणिक सेवा केली आहे. त्या कामाबाबत त्यांना आजच दोन तासांत दहा हजार रुपये देऊन सेवामुक्त करावे.” सयाजीरावांचे दुसरे अधिकारी खासेराव जाधव यांना नोकरीतून काढून टाकण्याची ब्रिटिश सरकारची मागणी मात्र महाराजांनी मान्य केली नाही. सयाजीरावांनी खासेरावांची दुसऱ्या खात्यात बदली करून दोन वर्षे वार्षिक पगारवाढ रोखण्याचा नाटकी आदेश काढला; परंतु काही दिवसांतच हा निर्णयही महाराजांनी बदलला.

## क्रांतिकारकांच्या शोधात : सयाजीराव

स्वातंत्र्याच्या ध्यासाने प्रेरित झालेले सयाजीराव नेहमी क्रांतिकारक राष्ट्रप्रेमी अधिकाऱ्यांच्या शोधात असत. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणजे प्रसिद्ध बंगाली आय. सी. एस. अधिकारी रमेशचंद्र दत्त यांची बडोद्यात केलेली नेमणूक होय. बंगालमध्ये डिव्हिजनल कमिशनर असणारे श्री. दत्त ब्रिटिश शासनाच्या आर्थिक नीतीचे टीकाकार होते. विनायक दामोदर सावरकरांचे धाकटे बंधू नारायण सावरकर नुकतेच डॉक्टर झाले होते. त्यांची मुंबईत दवाखाना सुरू करण्याची इच्छा होती. या काळात सावरकर अंदमान येथे कैदेत होते. सावरकरांनी अंदमानहून आपल्या भावाला पत्र लिहून कळविले की, "तू बडोद्यास जा. तेथे प्रज्ञावान आणि देशप्रेमी राजा राज्य करत आहे."

सयाजीराव लंडनमध्ये असताना हाइड पार्कमध्ये श्यामजी कृष्ण वर्मांसोबत फिरायला जात. श्यामजींच्या मनात असणारे राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्यप्राप्तीचा ध्यास यामुळे सयाजीराव त्यांना मदत करू लागले. लंडनमध्येच सयाजीरावांच्या मादाम कामा, तारकनाथ दास, बिपीनचंद्र पाल या क्रांतिकारकांशी भेटी होत गेल्या. अरविंद घोष तर महाराजांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. महाराजांचा या क्रांतिकारकांशी असणारा संपर्क आणि त्यांना केली जाणारी मदत ब्रिटिश सरकारपासून लपून राहिली नाही. यासंदर्भातील महाराजांविरुद्धचे अहवाल वरिष्ठांकडे जाऊ

लागले. यावर उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने सयाजीरावांविरुद्ध ब्रिटिश गुप्तहेरांची नेमणूक करून त्यांच्यावर भारतात आणि परदेश प्रवासात नजर ठेवणे सुरू केले.

१९०२ मध्ये विवेकानंदांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांनी बडोद्यास भेट दिली होती. भगिनी निवेदिता या तत्कालीन भारतातील महत्त्वाच्या क्रांतिकारी नेत्यांपैकी एक होत्या. त्यांचे स्वागत करण्यासाठी बडोदा रेल्वेस्टेशनवर अरविंद घोष आणि खासेराव जाधव हजर होते. भगिनी निवेदिता यांची राहण्याची व्यवस्था महाराजांच्या गेस्ट हाउसवर करण्यात आली. दुसऱ्या दिवशी त्यांनी महाराजांची भेट घेतली. भगिनी निवेदिता यांचे बडोद्यात जाहीर भाषणही झाले.

## दिल्ली दरबारातील स्वाभिमानी वर्तन

१ जानेवारी १९०३ ला इंग्लंडचे बादशहा पंचम जॉर्ज यांच्या राज्यारोहणानिमित्त तत्कालीन व्हॉईसराय लॉर्ड कर्झन यांनी दिल्लीमध्ये दरबाराचे आयोजन केले होते. प्रत्येक संस्थानिकाने या दरबाराच्या अगोदर होणारी मिरवणूक आणि दरबार या दोन्ही कार्यक्रमांना हजर राहावे असे आदेश कर्झन यांनी काढले. परंतु सयाजीरावांनी दरबारापूर्वी होणाऱ्या मिरवणुकीत हजर राहण्यास जाणीवपूर्वक असमर्थता दर्शविली. याचे कारण म्हणजे आदल्या दिवशी हत्तीवरून कर्झन आणि देशी राजांच्या निघणाऱ्या मिरवणुकीत बॉम्ब फेकून कर्झन यांची हत्या करण्याची योजना क्रांतिकारकांनी आखली होती. या योजनेच्या

अंमलबजावणीसाठी दामू अण्णा जोशींना पुण्याहून दिल्लीला पाठविले होते. या योजनेमागे अरविंद घोष आणि बाळ गंगाधर टिळक होते; परंतु काही कारणास्तव बॉम्ब फेकण्याची ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही.

मिरवणुकीतील सयाजीरावांच्या गैरहजेरीची चर्चा संपूर्ण दिल्लीत सुरु झाली. दरबाराच्या दिवशी प्रकृती अस्वास्थ्याने बेचैन सयाजीराव दरबारात पोहोचले. व्हॉइसराय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या स्वागतपर भाषणानंतर बादशहा पंचम जॉर्ज यांना मुजरा करण्याचा कार्यक्रम सुरू झाला. हैदराबादच्या निजामांनंतर दुसरा क्रमांक सयाजीराव महाराजांचा होता. बादशहा पंचम जॉर्ज समोर मुजरा केल्यानंतर महाराज दोन पावले मागे येऊन वळले आणि जागेवर परतले. सयाजीरावांच्या मुजऱ्याची ही पद्धत दरबारी रीतीला धरून नव्हती.

या प्रसंगानंतर गोपाळ कृष्ण गोखले महाराजांना भेटले. ते महाराजांना म्हणाले, “महाराज, आपण बादशहांना मुजरा ठरल्याप्रमाणे केला नाही आणि महाराणीस तर मुजराच केला नाही. दोघांना पाठ दाखवून परतला. ठरलेला दरबारी पोशाख, आभूषणे, सन्मानचिन्हे अंगावर न घालता मुद्दाम साध्या पांढऱ्या पोशाखात आलात, असे गंभीर आरोप तुमच्या विरुद्ध सुरू आहेत. परिस्थिती आणखी चिघळण्यापूर्वी आपण व्हॉइसराय यांना पत्र देऊन खुलासा करावा.” गोखले गेल्यानंतर महाराणी

चिमणाबाईंनी महाराजांना, एवढी साधी गोष्ट आपणाकडून अनवधानाने कशी घडली? अशी विचारणा केली. त्यावर सयाजीराव उत्तरले, "एवढे उन्हाळे, पावसाळे अनुभवले. आम्ही कशी चूक करणार? पदोपदी आमची कोंडी करणाऱ्या सत्तेविरुद्ध मनात असंतोष शिगेला पोहोचला होता. शेवटच्या क्षणी मनाने तो कौल दिला आणि आमचे ते स्वाभिमानी वर्तन घडले." सयाजीरावांचे दरबारातील हे वर्तन ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संतापातून घडल्याचे स्पष्ट होते.

दिल्ली दरबारातील सयाजीरावांच्या वर्तनामुळे अनेक वृत्तपत्रांनी त्यांच्याविरुद्ध मजकूर छापायला सुरुवात केली. सयाजीरावांचे मुजरा प्रकरण सर्वत्र गाजू लागले. नामदार गोखल्यांनी प्रकरण गंभीर होत असल्याची सूचना करून जाहीर माफी मागून प्रकरण मिटवण्याची विनंती सयाजीरावांना केली. अखेर स्वत:च्या इच्छेविरुद्ध महाराजांनी माफीपत्रावर सही केली. परंतु महाराजांच्या या निर्णयावर वेगवेगळ्या वर्तमानपत्रांमध्ये उलटसुलट प्रतिक्रिया छापून आल्या. यावर महाराज म्हणाले, "स्वत:ची बुद्धी गहाण टाकून केवळ दुसऱ्यांच्या आग्रहास्तव या जन्मात मी एक कृत्य केले. ते म्हणजे दिल्ली दरबाराच्या माफीचे होय. गोखल्यांसारख्यांची भीड मला मोडवली नाही, म्हणून मी गोत्यात आलो."

## भारतीय गंगनाथ राष्ट्रीय विद्यालय

अरविंद घोष यांच्या कल्पनेतून आणि सयाजीरावांच्या पाठिंब्याने नर्मदाकाठी 'भारतीय गंगनाथ राष्ट्रीय विद्यालया'ची स्थापना करण्यात आली. अरविंद घोष, खासेराव जाधव, केशवराव देशपांडे आणि प्रा. माणिकराव हे या राष्ट्रीय विद्यालयाचे संचालक होते. राष्ट्रप्रेमी आणि राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित झालेले देशभक्त तयार करण्याच्या उद्देशाने १७ मे १९०५ या दिवशी राष्ट्रीय विद्यालयाची सुरुवात झाली. या विद्यालयातील विद्यार्थ्यांना पारंपरिक गुरुकुल आश्रम पद्धतीचे शिक्षण दिले जात असे. सुरुवातीच्या काळात १५ ते २० अविवाहित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. पुढे ही संख्या शंभरपर्यंत गेली. या विद्यालयाच्या माध्यमातून तरुणांच्या शारीरिक विकासासोबत मानसिक विकासास प्रोत्साहन दिले गेले.

हे विद्यालय रेवाकंठाच्या संस्थानात असल्याने विद्यालय बंद करण्यासंदर्भात ब्रिटिश सरकारने रेवाकंठाच्या राणांवर दबाव आणला. यावर उपाय म्हणून गंगनाथ विद्यालय बडोद्यात सुरू करण्याचा निर्णय संचालक मंडळींनी घेतला. त्यानुसार ऑगस्ट १९०८ मध्ये नर्मदाकाठचे गंगनाथ विद्यालय बडोद्यातील अलकापुरी भागातील काशी विश्वेश्वराच्या मंदिरात सुरू करण्यात आले. १९१०-११ ला या विद्यालयात दत्तात्रय बाळकृष्ण

कालेलकर ऊर्फ मामा कालेलकर शिक्षक म्हणून रुजू झाले, तर पांडुरंग बापट यांनी विद्यार्थ्यांना बॉम्ब तयार करण्याची प्रक्रिया शिकवली होती. हेच बापट पुढे सेनापती बापट म्हणून प्रसिद्ध झाले.

या विद्यालयात राष्ट्रप्रेम, शारीरिक शिक्षण, सांस्कृतिक वारसा, शस्त्रांची उपासना यांची शिकवण आणि स्फोटके बनविण्याचे प्रशिक्षण दिले जाई. त्याचबरोबर देशभरातील राष्ट्रीय विचारांच्या देशभक्तांना येथे बोलावून त्यांच्या भाषणांचे आयोजनही केले जात असे. थोड्याच कालावधीत हे विद्यालय राष्ट्रीय चळवळीचे प्रमुख केंद्र बनले; परंतु ब्रिटिश सरकारला हे विद्यालय राजद्रोह वाटू लागले. हिंदुस्थानच्या गुप्तचर विभागाचा अहवाल गव्हर्नर जनरलपर्यंत पोहोचला. १९११ ला लॉर्ड हार्डिंग्जने सयाजीरावांविरुद्ध ब्रिटनच्या भारत मंत्र्यांच्या सचिवास आरोपपत्र पाठविले. ब्रिटिश सरकारच्या वाढत्या दबावामुळे डिसेंबर १९११ मध्ये सयाजीरावांनी हे विद्यालय बंद केले.

## माणिकराव आणि त्यांचा क्रांतिकारी आखाडा

एके दिवशी सुरपारंब्या खेळणारा चपळ गजानन माणिक हा विद्यार्थी सयाजीरावांच्या दृष्टीस पडला. गुणग्राहक सयाजीरावांनी दुसऱ्याच दिवशी त्याला राजवाड्यात बोलावून बक्षीस म्हणून टोपी देऊन त्याचे कौतुक केले. हा गजानन माणिक जुम्मादादांच्या आखाड्यात जात होता. त्याचे गुरू जुम्मादादा

बडोद्यात तरुणांना शारीरिकदृष्ट्या भक्कम करण्यासाठी एक आखाडा चालवत होते. सयाजीराव या आखाड्याला प्रोत्साहन आणि मदत करू लागले. पुढे माणिक जुम्मादादांचा पट्टशिष्य बनला. गुरूच्या स्वप्नपूर्तीसाठी माणिकरावांनी दांडिया बाजारातील जुम्मादादांचा आखाडा क्रांतिकारी चळवळीतल्या लोकांचे आश्रयस्थान बनविले.

जुम्मादादांची व्यायामशाळा ही स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेल्या समविचारी तरुणांचा आणि कार्यकर्त्यांचा अड्डा बनत चालली होती. माणिकरावांमध्ये असणाऱ्या समाजसेवा आणि नेहमी दुसऱ्यास मदत करणे या गुणांमुळे ते महाराजांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जाऊ लागले. देशभक्ती आणि स्वातंत्र्याच्या ध्यासाने प्रेरित करण्यासाठी अशा मजकूरच्या पुस्तिका छापून वितरित करणे, भित्तिपत्रकामधून असंतोषाचा संदेश पोहोचविणे आणि देशभरातील क्रांतिकारी चळवळींचे संघटन केंद्र म्हणून जुम्मादादांचा आखाडा प्रसिद्ध होऊ लागला. माणिकराव हे महाराजा सयाजीराव आणि देशभरातील क्रांतिकारी चळवळीतल्या लोकांमधील विश्वासू दुवा म्हणून काम करू लागले. माणिकराव स्वातंत्र्यपूर्व काळात शिवजयंती, गणेशोत्सवाच्या माध्यमातून जनजागृती करत होते. आखाड्यात सावरकर, सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या राष्ट्रपुरुषांची व्याख्याने आयोजित करून प्रबोधनातून समाजजागृती आणि परिवर्तनाचे काम माणिकराव करत.

१९१५ साली रासबिहारी बोस यांच्या नेतृत्वाखाली देशभरात अनेक ठिकाणी क्रांतिकारी उठावाची योजना आखण्यात आली होती. परंतु या योजनेची माहिती अगोदरच ब्रिटिश सरकारला मिळाली. त्यामुळे सरकारने शोध सुरू करण्यापूर्वी माणिकरावांनी या घटनेची सयाजीरावांना कल्पना देऊन बडोद्यातील मंडळींना सुरक्षित ठिकाणी पोहोचविले. ज्यावेळी क्रांतिकारकांचे नातेवाईक आपल्या घरात त्यांना आश्रय देत नसत त्यावेळी माणिकरावांनी धोका पत्करून खुदीराम बोस, पृथ्वीसिंह आजाद, भगतसिंह, सुखदेव, राजगुरू आणि सुरेंद्र पांडे यासारख्या क्रांतिकारकांना आपल्या आखाड्यात आश्रय दिला. पृथ्वीसिंह आजाद हे ‘स्वामीराव’ या नावाने व्यायामशाळेत राहत होते. भगतसिंग लाहोरच्या कॉलेजचे विद्यार्थी म्हणून शारीरिक शिक्षण घेण्यासाठी माणिकरावांच्या आखाड्यात आले होते.

सावरकरांचे बंधू बाबाराव आणि त्यांचे मित्र दत्तात्रय केतकर बडोदा कॉलेजमध्ये दिवसा शिक्षण घेत आणि रात्री आखाड्यात नाशिक मित्रमेळाच्या संघटनाचे काम करत. १९०९ ला झालेल्या जॅक्सन हत्याकांडाच्या प्रकरणामुळे बाबाराव सावरकरांना स्वत:च्या इच्छेविरुद्ध बडोदा कॉलेज सोडावे लागले. पुढे दत्तात्रय केतकर बडोदा कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले आणि माणिकरावांना सहकार्य करत राहिले. ब्रिटिश सरकारने माणिकरावांचा आखाडा बंद करण्यासाठी महाराजांवर अनेकदा दबाव आणला; पण महाराज प्रत्येकवेळी

त्यांना सांगत, “या आखाड्यातून राजद्रोही गोष्टींना मदत होते हे पुराव्यासह दाखवून द्या. मी तात्काळ त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करतो.” परंतु अनेकदा प्रयत्न करूनही ब्रिटिश सरकारला माणिकरावांच्या आखाड्यात राजद्रोही पुरावे सापडू शकले नाहीत. सयाजीरावांचे भक्कम पाठबळ असल्याने माणिकराव या आखाड्याच्या माध्यमातून क्रांतिकारकांच्या क्रांतिकार्यास सहकार्य करू शकले. अरविंद घोषांनी गुजरातमधील क्रांतिकारी विचारांच्या मंडळींची ‘मित्रमेळा’ या नावाने संघटना सुरू केली. माणिकराव हे बडोद्यातील मित्रमेळा संघटनेचे प्रमुख होते आणि त्यांचा आखाडा त्याचे केंद्र होते. नाशिकलाही मित्रमेळा संघटनेची शाखा होती. माणिकरावांनी या शाखेतील तरुणांना मल्लविद्येचे प्रशिक्षण देण्यासाठी आपल्या आखाड्यातील इब्राहिम नावाच्या पहिलवानास नाशिकला पाठवले होते. ही मित्रमेळा संघटना १९०४ मध्ये वि. दा. सावरकरांची ‘अभिनव भारत’ या नावाने पुढे आली.

## स्विस अकादमी

खासेराव आणि अरविंद घोषांनी महाराजांच्या सहकार्याने बडोद्यात एक महत्त्वाची क्रांतिकारी घटना घडवून आणली. खासेरावांचे लहान बंधू माधवराव जाधव हे बडोदा सैन्यात मेजर होते. माधवरावांना स्विस सैनिकी प्रशिक्षणासाठी स्वित्झर्लंडला पाठविण्याची योजना बाळ गंगाधर टिळक, अरविंद घोष आणि खासेराव जाधवांनी तयार केली. स्विस अकादमीतील

अधिकाऱ्यांना बडोद्यात बोलावून देशी सेनेला प्रशिक्षण देण्याची सयाजीरावांची प्रबळ इच्छा होती; परंतु तत्कालीन रेसिडेंट आणि लॉर्ड कर्झन यांच्या तीव्र विरोधामुळे ती पूर्ण होऊ शकली नसली तरी माधवरावांच्या माध्यमातून सयाजीरावांची ही इच्छा पूर्णत्वास आली असे म्हणता येईल. नवीन शस्त्रांचा अभ्यास करणे, बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण घेणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू होता. या प्रशिक्षणासाठी सयाजीरावांनी माधवरावांना रजा मंजूर करून प्रशिक्षणाच्या खर्चाची तरतूदही केली. त्याचबरोबर बाळ गंगाधर टिळकांनी लंडनमधील क्रांतिकारी श्यामजी कृष्ण वर्मा यांना पत्र लिहून माधवरावांना प्रशिक्षण काळात पैसे कमी पडल्यास मदत करण्यास सांगितले. माधवरावांनी प्रशिक्षण पूर्ण करून येताना बरोबर सैनिकी व्यवस्थापनाची सुमारे दोनशे पुस्तके आणली. प्रशिक्षण घेऊन परत आल्यानंतर माधवरावांनी बडोद्यात विश्वासू अधिकाऱ्यांच्या मदतीने क्रांतिकारकांना प्रशिक्षण देण्याचे केंद्र सुरू करण्याची योजना अरविंद घोष आणि खासेरावांनी आखली.

## राजद्रोही लेखनास राजाश्रय

महात्मा फुलेंचा 'शेतकऱ्यांचा असूड' हा ग्रंथ प्रकाशित होण्याअगोदर दोन वर्षे १८८१ मध्ये सयाजीरावांना राज्याधिकार प्राप्त झाले. १८८३ मध्ये बडोदा भेटीत फुलेंनी हा ग्रंथ सयाजीराव महाराजांना वाचून दाखविला. याच भेटीत महाराजांनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी मदत केल्याचा

उल्लेख या ग्रंथाच्या शेवटच्या पानावर येतो. विशेष म्हणजे या ग्रंथाचे पहिले दोन भाग नारायण मेघाजी लोखंडे संपादक असणाऱ्या दीनबंधू पत्रात क्रमशः प्रकाशित झाले होते; परंतु फुलेंनी या ग्रंथात भारतातील शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीसाठी जबाबदार भारतातील ब्राह्मणी व्यवस्थेबरोबरच ब्रिटिश सरकारवरही सडकून टीका केली होती. ब्रिटिश सरकारचा रोष आपल्यावर येऊ नये म्हणून सत्यशोधक असणाऱ्या लोखंडेंनी या ग्रंथाचे क्रमशः प्रकाशन बंद केले. या पार्श्वभूमीवर सयाजीरावांचे उघडपणे या ग्रंथाला अर्थसहाय्य करणे किती हिमतीचे होते हे आपल्या लक्षात येईल. नुकताच राज्यकारभार हाती घेतलेल्या अवघ्या २० वर्षांच्या राजाने कारकीर्दीच्या आरंभीच इंग्रजांशी थेट भिडण्याची ही कृती अतिशय महत्त्वाची आहे.

वर्तमानपत्रे, मासिके आणि विविध पुस्तके यांच्या माध्यमातून राजद्रोही लेखन करून सर्वसामान्यांमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण करणाऱ्या लेखकांना सयाजीरावांचे असणारे भक्कम पाठबळ समजून घेण्यासाठी नोव्हेंबर १९११ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग्ज यांनी परराष्ट्र खात्याच्या सचिवांकडे सादर केलेले सयाजीराव महाराजांविरुद्धचे आरोपपत्र अतिशय उपयुक्त ठरते.

या आरोपपत्रात लॉर्ड हार्डिंग्ज लिहितात, "बडोदा संस्थानात ब्रिटीश सरकारविरुद्ध वातावरण भडकावण्यात तेथील स्थानिक वृत्तपत्रांचा मोठा वाटा आहे. १९०९ साली बडोदा संस्थानने

'पुढारी' वर्तमानपत्राच्या प्रकाशनास परवानगी दिली. या पत्रात सुरुवातीपासून जहालमतवादी दृष्टिकोनच समोर येत आहे. यांचे संपादक श्री. व्ही. पी. साठे आहेत. बडोदा सरकारने कळविले की, साठे यांच्या अशा विचारसरणीची संस्थानला कल्पना नव्हती. पुढे आम्ही फारच आक्षेपार्ह लेखांकडे सरकारचे लक्ष वेधले यावर महाराजांनी संपादकास फक्त समज दिली; पण पुढारीत आक्षेपार्ह ब्रिटिश सरकार विरुद्धचा मजकूर प्रकाशित होतच राहिला. मधल्या काळात दोन विद्रोही नाटकांचे प्रकाशन झाले. त्याचे लेखक आहेत संपादक साठे. या नाटकावर मुंबई सरकारने बंदी घातली. बडोद्यातील 'चाबूक' नावाच्या दुसऱ्या वर्तमानपत्रातही आक्षेपार्ह लेख छापल्याबद्दल १९१० मध्ये आक्षेप घेण्यात आला. यानंतरही त्या पत्रात तसेच लेखन प्रकाशित होत राहिले. हिंदुस्थान सरकारच्या हस्तक्षेपाने शेवटी दोन्ही प्रकाशने थांबली. अलीकडे जानेवारी महिन्यात, बादशहाच्या हिंदुस्थान भेटीच्या संदर्भात टीका करणारा आक्षेपार्ह मजकूर 'बडोदा गॅझेट'मध्ये प्रकाशित झाला. या पत्राविरुद्धही कोणतीही कारवाई बडोदा सरकारने केली नाही."

सयाजीराव संस्थानातील राजद्रोही गोष्टींवर कोणतीही कारवाई करत नसल्याने ब्रिटिश सरकारने संस्थानात हस्तक्षेप करायला सुरुवात केली. ब्रिटिशांनी भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी १६७ देशद्रोही ग्रंथ आणि पुस्तिका जप्त केल्या. या पुस्तकांमधील स्फोटक मजकूर तरुणांना ब्रिटिश सरकारविरुद्ध भडकावण्याचे

काम करत असल्याचा आरोप ब्रिटिश सरकारने केला. विशेष बाब म्हणजे यापैकी १७ पुस्तिका बडोद्यातील प्रेसमध्ये छापलेल्या होत्या. अरविंद घोष यांच्या 'Which way Freedom?' या इंग्रजी पुस्तकाचा 'वनस्पती नी दवाओं' या नावाने गुजराती अनुवाद केला होता. या पुस्तकात क्रांतिकारकांसाठी काही सूत्रे दिली होती. त्यातील एक सूत्र, "To slay white officials is a merit, not a sin." म्हणजे, 'गोऱ्या अधिकाऱ्यास मारणे हे पाप नाही, तर ते एक पुण्यकर्म आहे.' ब्रिटिश सीआयडी अधिकारी व्हिंसेंट यांनी या पुस्तकाच्या काही प्रती बॅ. केशवराव देशपांडे राहत होते त्या बंगल्याच्या शेजारच्या विहिरीतून जप्त केल्या.

व्हिंसेंट यांनी नवसारीचे कलेक्टर खासेराव जाधवांची भेट घेऊन अरविंद घोषांच्या 'मुक्ती पथे कौन' पुस्तकाच्या पाचशे प्रती जप्त केल्या असून अधिक चौकशीसाठी पोलिसांची मदत देण्याची विनंती केली. तेव्हा खासेराव व्हिंसेंट यांना म्हणाले, "महाराजा गायकवाड यांच्या संस्थानात छापा घालायचा परवाना तुमच्याकडे आहे काय? तो अगोदर दाखवा." खासेरावांची ही भूमिका व्हिंसेंटना चकित करणारी होती. पुढे खासेरावांनी व्हिंसेंटना आपण आमच्या अधिकारावर अतिक्रमण केले, अशी तक्रार गव्हर्नरांकडे करणार असल्याचे सांगितले. यानंतर लगेचच बडोदा सरकारने मुंबई गव्हर्नरांना व्हिंसेंटच्या निषेधाचे

पत्र पाठवले. मुंबईच्या गव्हर्नरांनी या कृत्याबद्दल सयाजीरावांची लेखी माफी मागितली. हे उदाहरण भारतातील इतर संस्थानिकांहून सयाजीरावांचा दर्जा कसा वेगळा आणि इंग्रजांच्या बरोबरीचा होता हे स्पष्ट करते.

## सयाजीराव आणि महात्मा गांधी

१९१५ साली आफ्रिकेहून परतलेल्या महात्मा गांधींच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याबद्दल सयाजीरावांना आपुलकी होती. १९२३ मध्ये बडोद्यात केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, “आम्ही अस्पृश्य बांधवांना समता आणि बंधुत्व ही मानवी मूल्ये नाकारत आहोत. महात्मा गांधी आणि त्यांच्या विचारांची माणसे या सामाजिक प्रश्नांसाठी फार मोठे काम करत आहेत. जर आम्ही महात्मा गांधींचा सल्ला आणि मार्गदर्शन यांचे अनुकरण केले नाही, तर आपणास फार मोठ्या पश्चात्तापास सामोरे जावे लागेल.”

ज्या काळात गांधींचे नाव उच्चारणे हा गुन्हा ठरत असे त्या काळात सयाजीरावांनी जाहीर भाषणात गांधींचे अनुकरण करण्याचा सल्ला जनतेला दिला होता. ही बाब स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासातील क्रांतिकारक घटना म्हणून विचारात घ्यावी लागते. या भाषणामुळे ब्रिटिश सरकारमध्ये खळबळ उडाल्यानंतर गांधींच्या अस्पृश्य उद्धाराच्या कार्याची आपण स्तुती केल्याचा ‘खुलासा’ महाराजांनी केला.

महाराजा सयाजीराव आणि महात्मा गांधी यांच्यातील नात्याचे अचूक विश्लेषण एका प्रसंगावरून करता येईल. एकदा सयाजीराव आणि महात्मा गांधींची गुप्तभेट ठरली. साबरमतीपासून राजवाड्यापर्यंत गांधींच्या गुप्तप्रवासाची सोय महाराजांनी केली. महाराजांनी लक्ष्मीविलास पॅलेसच्या प्रवेशद्वारावर गांधींचे स्वागत करून त्यांना चर्चेसाठी ऐने महालात नेले. सयाजीरावांनी गांधींना आसनावर बसण्याची विनंती केली; पण गांधींनी "बापू, तुमच्यासमोर आम्ही खुर्चीवर बसणं शोभत नाही." म्हणत भारतीय बैठकीवर बसणे पसंत केले. सयाजीरावही आपली खुर्ची सोडून महात्मा गांधींसमोर जमिनीवर मांडी घालून बसले. होमरूल आंदोलनाने निर्माण झालेला असंतोष दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेऊन मार्च १९१९ मध्ये रौलट कायदा संमत केला. त्यानुसार कोणाही भारतीयाला कुठल्याही कारणाशिवाय अटक करण्याचा व देशद्रोहाच्या नावाखाली विनाचौकशी तुरुंगात डांबून ठेवण्याचा, शिक्षेविरुद्ध अपील नाकारण्याचा अधिकार सरकारला मिळाला. कायद्याची अंमलबजावणी फार भयानक पद्धतीने होऊ लागली. कायद्याविरोधात सर्वत्र निषेध सभा घेतल्या जाऊ लागल्या. या कायद्याविरोधात सर्वाधिक मोठे आंदोलन हे गांधीजींनी उभारले. १९१९ साली रौलट ॲक्टमुळे देशभर असंतोषाचा भडका उडाला. बडोद्यातील अमरेली, नवसारी, व्यारा, बडोदा या भागातही ब्रिटिश सरकारविरुद्ध निदर्शने झाली.

महात्मा गांधींच्या या आंदोलनास बडोदा राज्यातून मिळणाऱ्या पाठिंब्यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांना १६ एप्रिल १९१९ रोजी पाठवलेल्या पत्रात ब्रिटिश पोलीस कमिशनर लिहितात, "रौलट ॲक्टविरुद्ध महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या सत्याग्रहात बडोद्यातील अमरेली येथील ३०० लोकांनी भाग घेतला. १२ आणि १३ एप्रिल, १९१९ रोजी गांधींच्या अटकेच्या बातमीने अमरेलीतील ६० विद्यार्थ्यांनी काळे झेंडे दाखवून निषेध व्यक्त केला. गांधींची सुटका व्हावी म्हणून प्रार्थना सभा झाली. यावेळी ५०० माणसे उपस्थित होती. दिनांक ६ रोजीची सभा बोलावणाऱ्या निमंत्रकांमध्ये नगरशेट त्रिभुवन परमानंद, राजरत्न हिरालाल गोविंदजी वकील, चतुर्भुज जगजीवनदास वकील, जमनादास वामनजी वकील, सेठ त्रिभुवन मोतीचंद, सेठ सुलेमान अटबी, सेठ अमर दादा, सेठ मुसा महम्मद, सेठ म.सा.अब्राहम होते, त्यांची नावी 'रणोदय प्रेस', अमरेली इथे छापलेल्या पत्रकात समाविष्ट होती. या लोकांना इशारा दिला की, चळवळीमुळे होणाऱ्या कोणत्याही अनिष्ट परिणामांना ते जबाबदार असतील; आणि रौलट विधेयक त्यांना मुंबई प्रांतातील लोकांना लागू होईल. त्याचप्रकारे हायस्कूलच्या हेडमास्तरांनीही आपल्या विद्यार्थ्यांना समज द्यावी."

## सयाजीराव आणि बाबासाहेब आंबेडकर

महात्मा गांधींप्रमाणेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनादेखील सयाजीराव महाराजांनी भक्कम पाठबळ दिले. १९३० ते १९३२ दरम्यान झालेल्या तीनही गोलमेज परिषदांचे सयाजीराव महाराजांना संस्थानचे प्रतिनिधी म्हणून आमंत्रण होते. पहिल्या दोन परिषदांना सयाजीराव स्वतः उपस्थित राहिले. १९३१ च्या लंडन येथील गोलमेज परिषदेला अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बाबासाहेब उपस्थित होते. या परिषदेतील डॉ. आंबेडकरांचे विद्वत्तापूर्ण भाषण आणि दलित व अस्पृश्यांबद्दलचे विचार ऐकल्यानंतर सयाजीरावांनी खूश होऊन डॉ.आंबेडकरांना लंडनमधील हॅन्स क्रिसेंट हॉटेलमध्ये पार्टी दिली. या पार्टीत सयाजीरावांनी बाबासाहेबांचे पूर्वायुष्य व विद्वत्ता विशद करणारे भाषण केले. यावेळी बाबासाहेबांनी केलेल्या आवाहनानुसार उपस्थित मान्यवरांनी अस्पृश्योद्धाराच्या कामाला भरघोस मदत केली. यामध्ये महाराजांच्या १५० पौंडसह इतर मान्यवरांच्या १,३३५ पौंडच्या मदतीचा समावेश होता. आजच्या रुपयाच्या मूल्यात ती रक्कम ४ कोटी ४४ लाख रु. हून अधिक भरते.

## ब्रिटिश गुप्तचर विभाग आणि सयाजीराव

मराठा बारगिरांनी जन्माला घातलेल्या 'गनिमी कावा' युद्ध तंत्राचा विकास निजामशाही साम्राज्याचा सेनापती मलिक अंबरने केला. तर या तंत्राचा उत्तम उपयोग करत शिवाजी महाराजांनी तत्कालीन भारतात 'सर्वात वेगवान' म्हणून ओळखले जाणारे

सर्वसामान्यांचे सैन्य उभे केले. ब्रिटिश शासनाचे गुप्तहेर पाळतीवर असताना सयाजीराव महाराज आयुष्यभर त्यांना गुंगारा देत राहिले. आपल्या परदेश दौऱ्यादरम्यान सयाजीरावांनी श्यामजी कृष्ण वर्मा, मादाम कामा, केशवराव देशपांडे इ. क्रांतिकारकांना सातत्याने सक्रिय मदत केली.

हबशी गुलामांद्वारे भारतात आलेल्या गनिमी काव्याच्या परंपरेचा विकास हबशी गुलाम असणाऱ्या मलिक अंबरने केला. हा गनिमी कावा त्याच्याकडून शहाजीराजांमार्फत शिवाजी महाराजांकडे आला आणि शिवाजी महाराजांनी तो क्रांतिकारक पद्धतीने वापरला. या मलिक अंबरचे पहिले चरित्र मराठी भाषेत १९४१ साली बडोद्यातील सयाजी ग्रंथमालेत प्रकाशित झाले. शिवाजी महाराजांचा गनिमी कावा कालानुरूप यशस्वीपणे वापरण्याचे श्रेय केवळ सयाजीरावांना जाते. कारण ५८ वर्षे ब्रिटिश गुप्तहेर पाठीवर घेऊन भारताच्या स्वातंत्र्यचळवळीला भक्कम मदत करणाऱ्या सयाजीरावांना 'राजद्रोही' ठरवणे ब्रिटिश सरकारला शेवटपर्यंत शक्य झाले नाही. याचे पुरावे लंडनच्या इंडिया हाऊसमधील सयाजीरावांसंदर्भातील गुप्त फायलींमध्ये आपल्याला मिळतात.

सयाजीरावांसंदर्भातील अनेक गुप्त अहवाल ब्रिटिश सरकारने A Banded Box Case मध्ये सुरक्षित ठेवले. यातील कोणतीही फाइल आदेश दिलेल्या तारखेपासून पुढील ६० वर्षे कोणालाही बघता येत नव्हती. अगदी अभ्यासकांनाही या फायली उपलब्ध

होऊ शकत नव्हत्या. अलीकडच्या काळात आदरणीय बाबा भांड सरांनी स्वखर्चाने लंडनच्या इंडिया हाउसच्या लायब्ररीतून १८ **A Banded Box Case** फायली मोठ्या प्रयत्नांनी मिळवल्या आहेत. या फायलींमधून भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा आजवर अज्ञात राहिलेला इतिहास समोर येत आहे. या फायलींमधून समोर येणाऱ्या इतिहासातील काही घटनांची चर्चा अनिवार्य ठरते.

१ मे १९१२ रोजी बडोद्याचे रेसिडंट एच.व्ही. कॉब यांनी बडोद्यातील सरकारविरोधी कार्याची माहिती देण्यासाठी ब्रिटिश सरकारच्या परराष्ट्र विभागाच्या सचिवांना पत्र लिहिले. या पत्रात एक महिन्यापूर्वी बडोद्यातील सरकारविरोधी कारवाया रोखण्यासाठी सयाजीराव महाराजांनी उचललेल्या पावलांची माहिती देणारा अहवाल विभागाकडून मागवल्याचे नमूद केले आहे. या अहवालानुसार सरकारविरोधी कारवायांच्या प्रकरणांमध्ये सयाजीरावांनी दीड वर्षापूर्वी कारवाई केली असून त्यानंतर त्याबाबतीत कोणतीही हालचाल झाली नसल्याचे निरीक्षण कॉब यांनी नोंदवले आहे. के. जी. देशपांडे, साठे आणि एस.एल. बर्वे या तीन व्यक्तींना बडोदा संस्थानातून तात्काळ तडीपार करणे आवश्यक असल्याचे मत कॉब यांनी या पत्रात स्पष्टपणे नोंदवले आहे. कॉब यांनी उल्लेख केलेले के. जी. देशपांडे म्हणजेच केशवराव देशपांडे हे क्रांतिकारक आणि सयाजीराव

महाराजांचे पर्सनल सेक्रेटरी अरविंद घोष यांचे जवळचे मित्र होते, तर एस. एल. बर्वे यांनी रसेल्स सैनिकांच्या तुकडीतील शिपायावर जीवघेणा हल्ला केला होता. या तीनही व्यक्तींनी ब्रिटिश सरकारविरोधी कारवायांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्याचा संशय असला तरी सयाजीराव महाराजांनी त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही. परिणामी बडोद्याच्या रेसिडंटला थेट परराष्ट्र विभागाच्या सचिवांकडे तक्रार करावी लागली.

१९१३ मध्ये सयाजीराव महाराजांनी युरोपचा दौरा केला. या दौऱ्यात सयाजीरावांवर ब्रिटिश सरकारच्या गुन्हेगारी गुप्तचर विभागाने (Criminal Intelligence Department) सातत्याने पाळत ठेवली. या दौऱ्यात महाराजांवर पाळत ठेवणाऱ्या गुप्तहेरांनी ब्रिटिश सरकारला दोन टिपणे सादर केली. यातील दुसऱ्या टिपणात गुप्तहेरांनी केलेले महाराजांच्या दौऱ्याचे वर्णन आपल्याला शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याची पुरेपूर आठवण करून देते. याचे एक उदाहरण या टिपणाच्या सुरुवातीलाच आपल्याला मिळते. पॅरिस येथील के. बनकर यांच्या कार्यालयात सयाजीरावांनी त्यांचे काही कार्यालयीन काम केल्याची शंका या गुप्तहेरांना आली. या शंकेचा पुरावा म्हणून बनकर यांच्या कार्यालयातील टेबलावर आढळलेल्या महाराजांच्या अधिकृत शिक्क्याचा उल्लेख गुप्तहेरांनी या टिपणात केला आहे.

महाराजांच्या पावलावर पाऊल टाकत महाराणी चिमणाबाईंनीसुद्धा गनिमी काव्याची झलक या गुप्तहेरांना दाखवली. नियोजित कार्यक्रमानुसार महाराणींनी ८ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता झुरीचसाठी प्रयाण करणे अपेक्षित होते; परंतु रेल्वे निघण्याच्या १५ मिनिटे आधी चिमणाबाईंनी आपल्या सेविकेच्या आजारपणाचे कारण देत ऐनवेळी हा दौरा रद्द केला. त्यानंतर १७ सप्टेंबर ला महाराणी चिमणाबाई आपल्या लवाजम्यासह पॅरिसला गेल्या. यावेळी त्यांच्यावर पाळत ठेवण्यासाठी कुक नावाच्या एजंटने फर्स्ट क्लासची दोन, सेकंड क्लासचे एक तिकीट आणि मालवाहतुकीचे ३३ पॅकेज आरक्षित केल्या होत्या. परदेश प्रवासादरम्यान सयाजीराव आणि महाराणी चिमणाबाई यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी ब्रिटिश सरकारने केलेले हे प्रयत्न पाहता ब्रिटिश सत्तेने सयाजीरावांचा किती धसका घेतला होता हे स्पष्ट होते. या संदर्भात ब्रिटिश सरकारने १९०४ मध्ये स्थापन केलेल्या गुन्हेगारी गुप्तचर विभागाचा उद्देश आणि कार्यपद्धती जाणून घेणे गरजेचे आहे.

१९०३ मध्ये भारताचे तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी स्थापन केलेल्या पोलीस कमिशनच्या अहवालानुसार एप्रिल १९०४ मध्ये ब्रिटिश सरकारने सर हॅरॉल्ड स्टुअर्ट यांच्या नेतृत्वाखाली गुन्हेगार गुप्तचर विभागाची स्थापना केली. भारताची वासाहतिक सुरक्षा अबाधित ठेवणे आणि महत्त्वाच्या गुन्हेगारी प्रकरणांचा तपास करणे या दोन जबाबदाऱ्या

विभागावर सोपवण्यात आल्या. भारताच्या अंतर्गत गुप्तचर यंत्रणेची जबाबदारीदेखील या विभागाकडे देण्यात आली. त्याचबरोबर भारताच्या संदर्भात परकीय आणि देशविरोधी शक्तींनी आखलेल्या योजना अयशस्वी करण्याचे मुख्य काम या विभागाला नेमून देण्यात आले होते. स्वातंत्र्योत्तर भारतात २७ सप्टेंबर १९६८ ला स्थापन झालेली **'Research and Analysis Wing'** म्हणजेच रॉ संस्थेच्या कार्यपद्धतीची आपल्याला कल्पना आहेच. ब्रिटिश सरकारचा गुन्हेगारी गुप्तचर विभाग याच धर्तीवर कार्यरत होता. २६ मार्च १९१४ रोजी सी. आर. क्लीव्हलँड या अधिकाऱ्याने **Criminal Intelligence Office** ला जमा केलेले महाराजा सयाजीरावांसंदर्भातील टिपण या विभागाच्या कार्यपद्धतीची साक्ष देते.

२५ फेब्रुवारी १९१४ ला श्री. हॉलंड यांनी पत्राद्वारे आपल्याकडे युरोप दौऱ्यात सयाजीराव महाराज आणि त्यांच्या लवाजम्याने ज्यांचा सहवास टाळला पाहिजे अशा जहालमतवादी आणि अनिष्ठ लोकांची यादी मागितल्याचे क्लीव्हलँड या टिपणाच्या सुरुवातीलाच स्पष्ट करतात. क्लीव्हलँड यांनी अशी यादी तयार करण्याचा प्रयत्न केला; परंतु युरोप दौऱ्यात महाराजांना भेटण्याची शक्यता असलेल्या जहालमतवादी व्यक्तींची संख्या खूपच जास्त असल्याने त्यांनी हा प्रयत्न सोडला. श्री. वूड या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर प्रशासकीय सोयीसाठी

महत्त्वाच्या जहालमतवादी व्यक्तींचीच यादी करण्याचा निर्णय दोन्ही अधिकाऱ्यांनी घेतला. क्लीव्हलँड यांनी या टिपणासोबत ही यादी विभागाला सादर केली होती.

क्लीव्हलँड यांनी या टिपणात उल्लेख केलेल्या महत्त्वाच्या जहालमतवादी व्यक्तींमध्ये मादाम कामा, वीरेंद्रनाथ चटोपाध्याय, एडवर्ड हॉल्टन जेम्स, श्यामजी कृष्ण वर्मा, एस.के. राणा, सर वेल्टर स्ट्रीकलँड, चंपकरमण पिल्लाई, एडवर्डो डेल्गोडो, निरंजन पाल आणि जाफर अली खान यांचा समावेश होता. यातील मादाम कामा, श्यामजी कृष्ण वर्मा आणि जाफर अली खान हे तीन क्रांतिकारक सयाजीराव महाराजांना त्यांच्या परदेश प्रवासादरम्यान वारंवार भेटल्याचे अधिकृत पुरावे आपल्याला सयाजीरावांच्या चरित्रात सापडतात. या टिपणात क्लीव्हलँड लिहितात, “Any friends or associates of the above should be avoided. I do not mean to say that all their friends and associates are revolutionary plotters or traducers of the British Government but the majority certainly are and attempts at discrimination might be unsuccessful.” वर उल्लेख केलेल्या व्यक्तींचे मित्र अथवा त्यांच्याशी संबंधित कोणीही व्यक्ती युरोप दौऱ्यादरम्यान सयाजीराव महाराजांना भेटली नाही पाहिजे, अशी सूचना सुरुवातीला क्लीव्हलँड करतात; परंतु पुढच्याच वाक्यामध्ये या व्यक्तींशी संबंधित प्रत्येक व्यक्ती जहालमतवादी अथवा

ब्रिटिशविरोधी नसल्याचे ते स्पष्ट करतात; परंतु या व्यक्तींशी संबंधित बहुतांश लोक मात्र जहालमतवादी असून हे वर्गीकरण करणे अवघड असल्याची कबुली क्लीव्हलँड देतात. क्लीव्हलँड यांचे हे टिपण चिकित्सकपणे वाचले असता सयाजीरावांसंदर्भात नेमके कोणते धोरण अवलंबवायचे या संदर्भात ब्रिटिश सरकार पूर्णपणे गोंधळले असल्याचे लक्षात येते.

याच टिपणात क्लीव्हलँड यांनी असंतुष्ट इजिप्शियन गटाची माहिती सविस्तरपणे दिली आहे. ब्रिटिश सरकारबाबत असंतुष्ट असणाऱ्या इजिप्शियन क्रांतिकारकांचा एक गट भारतीय क्रांतिकारकांशी संधान साधण्याचा प्रयत्न करत असल्याची शंका क्लीव्हलँड या टिपणात व्यक्त करतात. इजिप्शियन क्रांतिकारकांकडून चालवल्या जाणाऱ्या 'La Patric Egyptienne' या पेपरमध्ये मदनलाल धिंग्रा, विनायक सावरकर आणि गंभीर गुन्हे केलेल्या तत्कालीन भारतीय राजकारणातील महत्त्वपूर्ण व्यक्तींचा गौरव करण्यात आला होता. हा असंतुष्ट इजिप्शियन क्रांतिकारकांचा गट सयाजीरावांना अजिबात भेटता कामा नये असे क्लीव्हलँड यांनी आपल्या टिपणात स्पष्टपणे नोंदवले आहे. विशेष बाब म्हणजे सयाजीराव महाराजांच्या युरोप दौऱ्यादरम्यान त्यांच्यावर पाळत ठेवायची की नाही अशी विचारणा करणारे पत्र लंडनमधील आपल्या कनिष्ठ सहकाऱ्याने आपल्याला पाठवले असल्याचे क्लीव्हलँड स्पष्ट करतात.

तर या टिपणाच्या ३ महिने आधी ९ डिसेंबर १९१३ रोजी अन्य एक टिपण क्लीव्हलँड यांनी गुन्हेगारी गुप्तहेर विभागास सादर केले होते. युरोप दौऱ्यात सयाजीराव महाराजांनी मादाम कामा, कृष्णवर्मा आणि एस.आर. राणा या प्रसिद्ध जहालमतवादी व्यक्तींचा थेट संपर्क टाळला असला तरी अनुपचंद मेलपचंद शाह, खिमचंद लालुभाई बनकर आणि हिरालाल बनकर या क्रांतिकारकांची मात्र सयाजीरावांनी भेट टाळली नसल्याचे क्लीव्हलँड यांनी स्पष्टपणे नोंदवले आहे. या सर्व व्यक्ती मादाम कामा यांच्याशी संबंधित असून प्रत्येकासंदर्भातील वेगळे टिपण या टिपणासोबत पाठवत असल्याचे क्लीव्हलँड यांनी अखेरीस म्हटले आहे. क्लीव्हलँड यांनी हेच टिपण ब्रिटिश सरकारचे तत्कालीन परराष्ट्र सचिव श्री. वूड यांनादेखील पाठवले होते. विशेष बाब म्हणजे क्लीव्हलँड यांनी हे टिपण गुन्हेगारी गुप्तचर विभागाला सादर केल्यानंतर केवळ १० दिवसांनंतर ते A Banded Box Case फाइलमध्ये ठेवण्याचे आदेश विभागाने दिले.

आधुनिक भारताच्या इतिहास लेखनात ज्यांनी जागतिक दबदबा निर्माण केला असे बिपीन चंद्र, सुमित सरकार, रणजीत गुहा, रामचंद्र गुहा यांसारख्या दिग्गज इतिहासकारांच्या इतिहास लेखनातसुद्धा सयाजीराव गायकवाड या नावाचा साधा उल्लेखसुद्धा ज्यावेळी होताना दिसत नाही तेव्हा आधुनिक भारताच्या इतिहासलेखनाच्या प्रचंड मर्यादा समोर येतात.

मध्ययुगीन कालखंडात अर्ध्या भारतावर आपले राज्य निर्माण करून दिल्लीच्या तख्ताला निर्णायक हादरे देणाऱ्या शिवरायांचे अपूर्ण कामच जणू सयाजीराव पूर्ण करत होते हे सयाजीरावांनी स्वातंत्र्य चळवळीला लागेल ती मदत देऊन सिद्ध केले आहे. अस्सल पुराव्यांचा आग्रह धरणारी इतिहासकारांची जमात जेव्हा सयाजीरावांसंदर्भातील हजारो कागदांकडे दुर्लक्ष करून भारतीय स्वातंत्र्याची क्रांतिगाथा लिहितात तेव्हा या क्रांतिगाथेचा अपुरेपणा स्पष्टपणे पुढे येतो. लंडनच्या इंडिया हाउसमध्ये आजही सयाजीरावांसंदर्भातील १५० गोपनीय फायली इतिहासकारांची वाट पाहत आहेत. जेव्हा या फायलींच्या आधारे स्वातंत्र्य चळवळीतील सयाजीरावांच्या योगदानाचा शोध घेतला जाईल तेव्हा या महान देशभक्ताच्या स्वातंत्र्य समर्पणापुढे अख्खा देश नतमस्तक होईल.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com